अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## स्वीकृत नगरसेवक पदासाठी उबाठा-मनसेत दरी

✔ **मुंबई** : महाराष्ट्राच्या राजकारणात मोठ्या घडामोडी पाहायला मिळत आहेत. मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी काल राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली होती. आज आदित्य ठाकरे आणि राज ठाकरे एका कार्यक्रमानिमित्त एकत्र आले होते. या भेटींच्या चर्चा सुरु असतानाच उद्धव ठाकरे यांनी मुंबई महापालिकेत स्वीकृत सदस्य म्हणून कोणाला संधी द्यायची याचा निर्णय घेतला आहे. ठाकरेंच्या शिवसेनेकडून स्वीकृत नगरसेवक म्हणून साईनाथ दुर्गे, माधुरी मांजरेकर आणि कैलास पाठक यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आल्याची माहिती आहे.सूत्रांच्या माहितीनुसार राज ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्या भेटीनंतर उद्धव ठाकरे यांनी हा निर्णय घेतला आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे गटनेते यशवंत किल्लेदार यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं त्यांच्या कोट्यातून एक स्वीकृत नगरसेवकपद मनसेला देण्याची मागणी केली होती. मात्र, उद्धव ठाकरे यांच्याकडून तीन जणांची नावं स्वीकृत नगरसेवक म्हणून निश्चित करण्यात आल्याची माहिती आहे. यामुळं मनसेला ठाकरेंच्या शिवसेनेकडून स्वीकृत नगरसेवकपद दिलं जाणार नसल्याच्या चर्चा सुरु आहेत. २८ फेब्रुवारीला स्वीकृत नगरसेवकांच्या नावांची घोषणा केली जाणार आहे.

www.surajyadigital.com । शुक्रवार, दि. २० फेब्रुवारी २०२६ । ▸ वर्ष : २४ वे ▸ अंक : १४३ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२




# बदले की आग, भाजपला लागला सुरुंग

## भिवंडीत आघाडी फुल्ल स्विंग

✔ भिवंडी/प्रतिनिधी

**चंद्रपुरात सर्वाधिक जागा जिंकूनही काँग्रेसला सत्ता गमवावी लागली. काँग्रेसमधील कुरबुरींचा, गटबाजीचा फायदा घेत भाजपने ठाकरेसेनेच्या मदतीने सत्ता स्थापन केली. आता काँग्रेसने चंद्रपूरचा बदला भिवंडीत घेण्याची तयारी सुरु केली आहे. भाजपमधील अंतर्गत वादाचा फायदा काँग्रेसला होताना दिसत आहे. भाजपमधील फुटीर गटाने काँग्रेसला पाठिंबा दिला आहे. त्यामुळे महापालिकेवर काँग्रेस प्रणित आघाडीची सत्ता येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.**



भिवंडी महापालिका निवडणुकीत काँग्रेसने सर्वाधिक ३० जागा जिंकल्या. भाजपने २२ जागांवर यश मिळवले. शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला प्रत्येकी १२ जागा मिळाल्या. भिवंडी महापालिकेत सत्ता स्थापनेसाठी ४६चा आकडा गाठणे गरजेचे आहे. भाजपचा एक गट फुटलेला आहे. या गटात ९ नगरसेवक आहेत. त्यांनी काँग्रेस प्रणित भिवंडी सेक्युलर फ्रंटला पाठिंबा दिला आहे. त्यामुळे भाजपला धक्का बसला आहे. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपचा फुटीर गट यांचे संख्याबळ ५० च्या पुढे जात आहे.

भिवंडी महापालिका निवडणुकीचा निकाल लागून महिना उलटला आहे. पण तरीही सत्ता स्थापनेचा पेच कायम आहे. भाजपच्या नगरसेवकांची गट नोंदणी झालेली आहे. त्यानंतर ९ नगरसेवक फुटले आहेत. भाजपने महापौरपदासाठी नारायण चौधरी यांचे नाव जाहीर केले होते. पण त्यानंतर त्यांची उमेदवारी रद्द करण्यात आली. स्नेहा पाटील यांना उमेदवारी जाहीर झाली. यानंतर नाराज झालेल्या चौधरींनी काँग्रेसने स्थापन केलेल्या भिवंडी सेक्युलर फ्रंटचा पर्याय निवडला. यानंतर काँग्रेसने चौधरी यांना महापौरपदाची उमेदवारी जाहीर केली. तसा व्हिपही जाहीर केला.

चंद्रपुरात भाजपने काँग्रेसमधील गटबाजीचा फायदा घेतला. आता काँग्रेसने भाजपमधील अंतर्गत गटबाजीचा फायदा घेत भिवंडीत सत्ता स्थापनेची तयारी सुरु केली आहे. भाजपमधील ९ नगरसेवकांचा फुटीर गट काँग्रेस सोबत गेला आहे. त्यामुळे काँग्रेसच्या भिवंडी सेक्युलर फ्रंटची सत्ता येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

सत्ता मिळवण्यासाठी काँग्रेस विचारांशी, विचारधारेशी तडजोड करणार नाही. आम्ही भाजप , शिंदेसेनेसोबत जाणार नाही. आम्ही त्यांचा पाठिंबा घेणार नाही आणि त्यांना पाठिंबा देणारही नाही, असे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले. भाजपमधील नगरसेवकांच्या एका गटाने काँग्रेस प्रणित सेक्युलर फ्रंटमध्ये येण्याचा निर्णय घेतला आहे. भाजप सोडून, त्यांच्या विचारधारेचा त्याग करुन कोणी आमच्या सोबत येत असेल तर आम्ही चर्चा करु, अशी आमची भूमिका आहे. पक्ष सोडणार असतील तरच चर्चा करु अशी आमची अट होती. आम्हाला त्यांच्याकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला, असे सपकाळ म्हणाले.

नारायण चौधरी आधी काँग्रेसमध्येच होते. निवडणुकीच्या आधी ते भाजपमध्ये गेले. आता त्यांनी वेगळा गट तयार केला आहे. काँग्रेस प्रणित भिवंडी सेक्युलर फ्रंटमध्ये येण्याची भूमिका त्यांनी घेतली आहे. त्यामुळे आम्ही त्यांचं स्वागत करतो, असं सपकाळ म्हणाले.




# दोन्ही राष्ट्रवादीत जुंपली?

## पवारांची उडवली खिल्ली
## भुजबळांचा खोचक टोला

✔ सोलापूर/प्रतिनिधी

**राज्यातील दोनही राष्ट्रवादी काँग्रेस नेत्यांमध्ये विलीनीकरणावरून अजूनही खडजंगी सुरूच आहे. खासदार डॉ. अमोल कोल्हे संयुक्तिक राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष झाले असते असे रोहित पवारांनी पत्रकार परिषदेत म्हटले होते. त्यांच्या या वक्तव्यामुळे चर्चांना उधाण आले होते. आता रोहित पवारांनी केलेल्या या दाव्याची राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते तथा मंत्री छगन भुजबळ यांनी खिल्ली उडवली आहे. 'विलीनीकरण झाले नाही आणि कोण कोणत्या पदावर बसणार हे ठरवून टाकले. मग उपमुख्यमंत्रीही ठरवला असेल, पक्षाचा राष्ट्रीय अध्यक्षही ठरवला असेल', असा खोचक टोला छगन भुजबळांनी रोहित पवार यांना लगावला आहे.**

### छगन भुजबळ काय म्हणाले?

''आता हे सगळे वेगवेगळे दावे करत आहेत, त्यांच्याबरोबर (शरद पवार गटातील नेते) अजित पवार यांनी राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाचे ठरवले होते, असे ते म्हणतात. मात्र, अजित पवार यांनी आम्हाला काही सांगितलेच नाही. मात्र, दोन्ही राष्ट्रवादीचे विलीनीकरण झाले सुद्धा नाही, त्याआधीच कोण कुठल्या पदावर बसणार हे देखील ठरवून टाकले होते. मग त्यामध्ये उपमुख्यमंत्री कोण असेल? हे देखील ठरले असेल. पक्षाचा राष्ट्रीय अध्यक्ष कोण होणार? हे देखील ठरले असेल. आता कोणी काहीही म्हणत असले तरी आपण त्यावर काय बोलणार?'', असे म्हणत भुजबळ यांनी रोहित पवारांच्या वक्तव्याची खिल्ली उडवली.

### रोहित पवारांनी काय दावा केला?

''संयुक्तिक राष्ट्रवादीचे डॉ.अमोल कोल्हे प्रदेशाध्यक्ष झाले असते. अशी दादांची तशी इच्छा होती. त्यामुळे अमोल कोल्हे प्रामाणिकपणे पुढाकार घेत होते. याबाबत अमोल कोल्हे, सुप्रिया सुळे, शशिकांत शिंदेंनी सांगितलेय. दोन्ही पक्षांच्या एकत्रीकरणाकरता जयंत पाटलांच्या घरी १३ बैठका झाल्या आहेत. पाहिजेतर सीसीटीव्ही फुटेज तपासा. जयंत पाटलांनीही याबाबत स्पष्टीकरण दिले आहे'', असे रोहित पवारांनी माध्यमांशी बोलताना म्हटले होते.

### अमोल कोल्हेंनी काय म्हटले होते?

''जे काही ठरले होते ते पब्लिक डोमेनमध्ये बऱ्याचदा आलेले आहे. दोन्ही पक्षाच्या एकत्रिकरणाच्या चर्चा झाल्या होत्याा, ही वस्तुस्थिती आहे. माळेगाव सहकारी साखर कारखान्याची प्रचारसभा संपवून आम्ही हा प्रवास केला होता'', असे अमोल कोल्हे यांनी म्हटले आहे. ''तसेच दोन्ही पक्षांच्या एकत्रीकरणाकरता १४ बैठका झाल्या होत्या, ११ वेळा जयंत पाटलांच्या घरी बैठका झाल्या होत्या.

ICC MEN'S T20 WORLD CUP

### आजचा सामना

ऑस्ट्रेलिया v/s ओमान

स्थळ : पेल्लेकेले
वेळ : सायंकाळी ७ वाजता

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



माझी अभ्यास करायची वेळ झाली आहे !

कल्याण
130-49-199

मुंबई
259-68-260

## हायकोर्टाचा ऐतिहासिक निकाल

## एकल मातेला बहाल झाले सर्व कायदेशीर हक्क

✔ मुंबई/प्रतिनिधी

मुलाची सार्वजनिक ओळख केवळ वडिलांच्या नावापुरती मर्यादित असू शकत नाही, असा ऐतिहासिक निर्वाळा देत मुंबई उच्च न्यायालयाने एकल मातेला आपल्या पाल्याच्या नावापुढे स्वतःचे नाव, आडनाव आणि जात लावण्याचा कायदेशीर अधिकार बहाल केला आहे. एकट्या आईने वाढवलेल्या पाल्याला केवळ अर्जाच्या स्वरुपाच्या



गरजेनुसार वडिलांचे नाव, आडनाव आणि जात लावण्यास भाग पाडले जाऊ शकत नाही तसेच अल्पवयीन मुलीला शाळेच्या नोंदींमध्ये तिचे नाव आणि जात बदलण्याची परवानगी देखील दिली.

पाल्याच्या सार्वजनिक ओळखीसाठी एकट्या आईला पूर्ण पालक म्हणून मान्यता देणे हे दानधर्माचे काम नाही, तर संवैधानिक निष्ठा आहे. तसेच, असे करणे हे पित्तसत्ताक सक्तीपासून संवैधानिक निवडीकडे आणि हक्क म्हणून प्रतिष्ठेकडे जाण्याचे प्रतिबिंब आहे, असे निरीक्षणही न्यायमूर्ती विभा कंकणवाडी आणि न्यायमूर्ती हितेन वेणेगावकर यांच्या खंडपीठाने हा (अधिक वृत्त पान ७ वर...)

### अधिकाऱ्यांना आदेश

पालकत्व, संगोपन, त्याग, हिंसाचार किंवा सामाजिक स्वीकृती याकडे दुर्लक्ष करून, पितृत्वाची ओळख ही जातीचा एकमेव मार्ग मानणारी प्रथा संरचनात्मक असमानता निर्माण करते आणि समान संरक्षण नाकारते. सध्याच्या प्रकरणात, मूल केवळ आईच्या सामाजिक वातावरणात आणि तिच्या जातीच्या समुदायात वाढले आहे, असे नमूद करून संबंधित शाळा अधिकाऱ्यांनी मुलाचे नाव दुरुस्त करून त्यात आईचे नाव आणि जात समाविष्ट करण्याचे आदेश न्यायालयाने दिले.

## अनेक धक्कादायक नावे; उत्सुकता शिगेला

# आज स्वीकृत, स्थायी आणि परिवहन सदस्य होणार फायनल

✔ सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर महापालिकेची नवीन टर्ममधील पहिली सर्वसाधारण सभा शुक्रवार, दि. २० फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता बोलवण्यात आली आहे. या सभेमध्ये १० स्वीकृत सदस्य, स्थायी समितीचे १६ तर परिवहन समितीच्या १२ सदस्यांची नियुक्तीवर शिक्कामोर्तब होणार आहे. प्राप्त ६२ अर्जांपैकी स्वीकृत नगरसेवकसाठी दहा जणांची नावे फायनल होणार आहेत. स्वीकृत सदस्यासाठी अनेक धक्कादायक नावे असण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

नूतन महापौर विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा महानगरपालिकेच्या सभा होणार आहे. या सभेत स्वीकृत सदस्यासाठी मोठी रस्सीखेच असणार आहे. एकूण ६२ अर्जांपैकी दहा स्वीकृत सदस्यांची नावे होणार फायनल महापालिकेतील स्वीकृत सदस्यत्वासाठी एकूण ६२ अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यापैकी पक्षीय बलाबलानुसार भाजपकडे नऊ तर एमआयएमकडे एक जागा जाणार आहे.




भाजपाने एकूण इच्छुक विविध जणांना अर्ज भरण्याच्या सूचना दिल्या असल्या तरी त्याहूनही अधिक अर्ज दाखल झाले आहेत. यात अनेक धक्कादायक नाव आहेत.

रोहिणी तडवळकर यांच्यासह मारवाडी आणि गवळी समाजाचा एक प्रतिनिधींची निवड निश्चित झाली आहे. बाकी सहा नावांबाबत सपेन्स आहे. ती नावे शुक्रवारी सकाळीच कळणार आहे. दुसरीकडे एमआयएम पक्षाने वरिष्ठांच्या आदेशानुसार उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यांच्याकडून तीन जणांनी अर्ज भरले आहे. गटनेत्यांनी सालार यांचे नाव अधिकृत असल्याचे स्पष्ट केले आहे.

उद्याच्या सभेत स्वीकृत सदस्य नावे फायनल होणार आहेत. स्थायी समिती व परिवहन समिती सदस्यांची नियुक्तीही यावेळी होणार आहे. स्थायीच्या सभापतीपदासाठी कोणाची वर्णी लागणार याची उत्सुकता आहे. मिळालेल्या माहितीनुसार लिंगायत समाजाकडे हे पद जाणार आहे. तर स्वीकृत नगरसेवकपदी ज्यांना संधी मिळणार नाही त्यातील काहींची वर्णी परिवहन सदस्यपदी लागण्याची शक्यता आहे.

### अजित पवारांचा पुतळा उभारण्याचा सभेत प्रस्ताव

सोलापूर महापालिकेच्या दि. २० रोजी होणाऱ्या सर्वसाधारण सभेत माजी उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्याचा प्रस्ताव दाखल करण्यात आलेला आहे. राष्ट्रवादीचे नगरसेवक वैभव हत्तुरे, काँग्रेसचे चेतन नरोटे, भाजपाचे किरण देशमुख व सेनेचे अमोल शिंदे यांचा अजित पवारांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्याचा प्रस्ताव आहे. हा पुतळा सात रस्ता परिसरातील कारागीर, पेट्रोल पंपासमोर उभा राहावा असेही प्रस्तावात म्हटले आहे.

### बी २ उठविण्यासंदर्भात सभासद प्रस्ताव

महापालिकेचे सदस्य विनोद भोसले, सिध्देश्वर कमटम, विजया खरात यांनी सोलापूर शहरातील विविध परिसरातील मिळकतींवर असलेल्या बी २ संदर्भात २० फेब्रुवारी रोजी होणाऱ्या महापालिकेच्या सर्वसाधारण सभेपुढे सभासद प्रस्ताव ठेवला आहे. बी २ (सत्ता प्रकार) उठवण्याकरिता राज्य शासनास विनंती करण्यासाठी सर्वसाधारण सभेकडे मान्यतेस्तव हा पाठविण्यात येत आहे. सभेने बी २ (सत्ता प्रकार) उठविण्याकरता राज्य शासनास विनंती करावी, असे या प्रस्तावात नमूद केले आहे.